जा.क्र.जिपना/आरोग्य/बदली/ 2816 /२०२०
कार्यालय : जिल्हा परिषद (आरोग्य विभाग)
नागपूर. दिनांक :- 17/7/2020

प्रति,

१) खंड विकास अधिकारी, पंचायत समिती ———— (सर्व)

२) तालुका आरोग्य अधिकारी ——— (सर्व)

३) वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र —— (सर्व)

विषय :- जिल्हा परिषद च्या गट क वर्ग ३ व गट ड वर्ग ४ च्या बदल्यांच्या धोरणाची अंमलबजावणी सर्व साधारण स्थानांतरण २०२० विनंती बदली अंतीम वास्तव्य जेष्ठता यादी प्रसिध्द करण्याबाबत.

संदर्भ :-१) ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्रमांक जिपब/४१४/ प्र.क्र.१२२/आस्था-१४/ दि.१९ मे २०१४

२) ग्राम विकास विभाग शासन पत्र क्रमांक /संकीर्ण/२०२०/प्रक्र८२/आस्था१४ दिनांक ९ जुलै २०२०

३) जा.क्र.जिपना/आरोग्य/बदली/ २४७९/२० दिनांक १५.७.२०२०

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, जिल्हा परिषदच्या गट क वर्ग ३ व गट ड वर्ग ४ च्या बदल्यांच्या धोरणाची अंमलबजावणी सर्व साधारण स्थानांतरण २०२० करीता आरोग्य विभागातील कार्यरत औषधी निर्माण अधिकारी,आरोग्य सेवक (म.),आरोग्य सेवक (पु.),आरोग्य सहाय्यक (म.) आरोग्य सहाय्यक(पु.),प्रयोगशाळा तंत्रज्ञ, कुष्ठरोग तंत्रज्ञ, आरोग्य पर्यवेक्षक या संवर्गाची एकाच तालुक्यात कार्यरत असणाऱ्या विनंती बदली कर्मचाऱ्यांची तात्पुरती वास्तव्य जेष्ठता यादी हया कार्यालयाचे संदर्भीय पत्र क्रमांक ३ अन्वये प्रसिध्द करुन त्यावर आक्षेप मागविण्यात आले होते.

उपरोक्त संदर्भ क्र.२ नुसार शासन निणर्यातील तरतूदी नुसार सर्व साधारण बदली सत्र सन २०२० करीता उपरोक्त संवर्गातील विनंती बदली पात्र कर्मचाऱ्यांची अंतीम वास्तव्य सेवा जेष्ठता यादी या व्दारे प्रसिध्द करण्यात येत आहे.

आपणास सुचित करण्यात येते की, आपले अधिनस्त कार्यरत कर्मचाऱ्या पैकी सदरहू बदली पात्र कर्मचाऱ्यांची यादी नाव समाविष्ठ असलेल्या कर्मचाऱ्यास दिनांक २३.०७.२०२० रोजी दुपारी १२.०० वाजता कै.आबासाहेब खेडकर सभागृह जिल्हा परिषद नागपूर येथे समुपदेशन प्रक्रिये साठी उपस्थित राहण्याबाबत सुचना आपले स्तरावरुन निर्गमित करण्यात याव्या. तसेच सदरहू यादी त्यांचे निदर्शनास आणून द्यावी व पोच पावती भरुन घेवून दिनांक २०.०७.२०२० पर्यंत उलट टपाली या कार्यालयात सादर करण्यात यावी. तसेच प्रशासकिय बदलीस पात्र कर्मचाऱ्यापैकी ज्यांना बदली पासून सुट किंवा प्राधान्य संबंधी सवलती घ्यावयाचे असल्यास त्यांनी दावा केल्या संबंधी पुरावे आणी विनंती बदली साठी विनंती अर्जास बदली करीता नमूद कारणा संबंधी योग्य पुरावा सोबत घेवून येणे बाबत सुचित करण्यात यावे.

आपणास असेही निर्देश देण्यात येते की, एखाद्या कर्मचाऱ्याने सदर यादी निदर्शनास आणून न दिल्या मूळे ते समुपदेशन प्रक्रियेत उपस्थित राहू शकले नाही या बाबत तक्रार केल्यास व त्यामूळे समुपदेशन प्रक्रियेत अडथळा निर्माण झाल्यास किंवा न्यायालयीन बाबी उदभवल्यास त्यांची संपूर्ण जबाबदरी कार्यालय प्रमूखची राहील यादी नोंद घ्यावी.

सहपत्र :- वास्तव्य सेवा जेष्ठता

अति- मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नागपूर

**प्रतिलीपी माहितीस सविनय सादर :-**

१) मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद, नागपूर

२) मा.उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, नागपूर.

३) मा.सभापती .................... विषय समिती, जिल्हा परिषद, नागपूर.वरील बदली प्रक्रियेस उपस्थित राहण्यास विनंती आहे.

**प्रतिलीपी माहितीस अग्रेषित :-**

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) जिल्हा परिषद, नागपूर.

अति- मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,नागपूर